**(न्यायालय अवमान तक्रार क्रं. २१/२०२३)**

**<u>आदेश नि. यु—७</u>**

१) प्रस्तुतचा अर्ज तक्रारदारांनी दाखल केलेला असुन असे प्रतिपादन केले आहे की, या प्रकरणात प्रतिवादी/आरोपी यांचे नाव समाविष्ट करणेसाठी मुळ तक्रारीत दुरुस्ती करण्याची परवानगी मिळणे आवश्यक आहे आणि अर्जात नमुद केलेले प्रतिवादी/आरोपी क्र. २ ते ५ यांचा या प्रकरणात समावेश झाल्यास तक्रारदारांच्या हक्कात पारीत झालेल्या न्यायनिर्णयाची अंमलबजावणी लवकरात लवकर होईल.

२) प्रस्तुतच्या अर्जावर प्रतिवादी/आरोपी हयांना त्यांचे म्हणणे दाखल करण्यात तक्रारदारांकडुन या अर्जाची प्रत मिळुनसुध्दा यश न आल्यामुळे हे स्पष्ट होते की, प्रतिवादी/आरोपी हयांना तक्रारदारांच्या या उपरोक्त दुरुस्तीच्या अर्जात म्हणणे दाखल करण्यात कोणताही रस नाही. त्याचबरोबर तक्रारदारांना त्यांच्या या तक्रारीत प्रतिवादी/आरोपी हयांचा समावेश करण्याची परवानगी दिल्यास प्रतिवादी/आरोपी हयांची कोणतीही अपरिमित हानी होणार नाही आणि तक्रारदारांच्या या युक्तीवादात देखील तथ्य आढळते की, प्रतिवादी/आरोपी हयांना अजुनपर्यंत त्यांच्या हक्कात पारीत झालेल्या न्यायनिर्णयाची अंमलबजावणी करण्यात यश आलेले नाही, त्यामुळे न्यायनिर्णयाची अंमलबजावणी होणेकरीता प्रतिवादी/आरोपी हयांचा समावेश होणे आवश्यक ठरते. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येत असुन तक्रारदारांना असे निर्देशित करण्यात येत आहे की, त्यांनी पुढील तारखेस तक्रारीमध्ये दुरुस्ती करण्याच्या दृष्टीकोनातुन आवश्यक ती कारवाई करावी.

SHARDUL SHASHIKANT JAHAGIRDAR

Digitally signed by SHARDUL SHASHIKANT JAHAGIRDAR
Date: 2026.03.09 10:44:03 +0530

**(शार्दुल श. जहागिरदार)**
**न्यायाधीश,**
**कामगार न्यायालय, बुलडाणा.**

**दिनांक :— ०६/०३/२०२६**
**ठिकाण :— बुलडाणा.**